आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२० मे २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात देशभरात साडे ५७ टक्के मतदानाची नोंद, पश्चिम बंगालमध्ये सर्वाधिक तर महाराष्ट्रात सर्वात कमी मतदान
- राज्यातलं लोकसभा निवडणुकीचं मतदान पूर्ण, प्राथमिक आकडेवारीनुसार पाचव्या टप्प्यात ५० टक्क्यांपेक्षा कमी मतदानाची नोंद
- छत्तीसगडमध्ये रस्ते अपघातात १४ महिलांसह १५ जणांचा मृत्यू
- इराणचे अध्यक्ष एब्राहिम रईसी यांच्या निधनामुळं देशात उद्या एक दिवसाचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर

**आणि**

- आशियाई ॲथलेटिक रिले चॅम्पियनशीपमध्ये भारतीय मिश्र संघाला सुवर्ण पदक

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्याचं मतदान आज संपलं. प्राथमिक आकडेवारीनुसार देशात सरासरी साडे ५७ टक्के मतदानाची नोंद झाली. सर्वाधिक ७३ टक्के मतदानाची नोंद पश्चिम बंगालमध्ये तर सर्वात कमी सुमारे ४९ टक्के मतदानाची नोंद महाराष्ट्रात झाली. लडाखमध्ये ६७ टक्क्यांहून अधिक, झारखंडमध्ये ६३ टक्के, ओडिशा सुमारे ६१ टक्के तर उत्तर प्रदेश, बिहार आणि जम्मू काश्मिरमध्ये ५० टक्क्यांहून अधिक मतदान झालं.

सहा राज्यं आणि दोन केंद्रशासित प्रदेशांमधून एकंदर ६९५ उमेदवारांचं भविष्य मतपेटीत बंद झालं. यात महाराष्ट्रातल्या १३ मतदारसंघांचाही समावेश आहे. केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह, पियुष गोयल, स्मृती इराणी, काँग्रेसचे राहुल गांधी आणि किशोरी लाल शर्मा, नॅशनल कॉन्फरन्सचे ओमर अब्दुल्ला, लोक जनशक्ती (रामविलास) पक्षाचे चिराग पासवान यांच्यासह इतर महत्त्वाचे उमेदवार निवडणुकीच्या या टप्प्याच्या रिंगणात होते.

<><><><><>

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात राज्यातल्या १३ मतदारसंघांसह संपूर्ण राज्यात लोकसभा निवडणुकीचं मतदान आज पूर्ण झालं. प्राथमिक आकडेवारी नुसार आज ४८ पूर्णांक ८८ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली आहे. यंदा दिंडोरीत सर्वाधिक ५७ टक्क्यांहून अधिक आणि पालघर ५४ टक्क्यांहून अधिक मतदानाची नोंद झाली. सर्वात कमी, म्हणजे ४१ पूर्णांक ७० शतांश टक्के मतदान कल्याणमध्ये झालं आहे. आज मतदान झालेल्या १३ पैकी १० मतदारसंघांमधलं मतदान प्राथमिक आकडेवारीनुसार ५० टक्क्यांपेक्षाही कमी आहे.

भिवंडीत ४८ पूर्णांक ८९ शतांश टक्के,

धुळ्यात ४८ पूर्णांक ८१ शतांश टक्के,

नाशिक ५१ पूर्णांक १६ शतांश टक्के,

उत्तर मध्य मुंबई मतदारसंघात ४७ पूर्णांक ३२ शतांश टक्के,

उत्तर पूर्व मुंबई इथं ४८ पूर्णांक ६७ शतांश टक्के

उत्तर पश्चिम मुंबई ४९ पूर्णांक ७९ शतांश टक्के,

दक्षिण मुंबई ४४ पूर्णांक २२ शतांश टक्के

आणि

दक्षिण मध्य मुंबई ४८ पूर्णांक २६ शतांश टक्के,

तर ठाण्यात ४५ पूर्णांक ३८ शतांश टक्के मतदान झाल्याची नोंद आहे. गेल्या निवडणुकीच्या तुलनेत हे मतदान कमी आहे. २०१९ च्या निवडणुकीत राज्यातल्या मतदानाची अंतिम टक्केवारी ६० पूर्णांक ७९ शतांश टक्के, तर २०१४ च्या निवडणुकीत ६० पूर्णांक ३२ शतांश टक्के इतकी होती.

राज्यातल्या १३ मतदारसंघांमधे मिळून २६४ उमेदवारांचं भविष्य आज मतदान यंत्रात बंद झालं. त्यात केंद्रीय मंत्री पीयुष गोयल, कपिल पाटील, श्रीकांत शिंदे, राजन विचारे, हेमंत गोडसे, राहुल शेवाळे, अरविंद सावंत हे विद्यमान खासदार तसंच वर्षा गायकवाड, उज्ज्वल निकम, अनिल देसाई हे महत्त्वाचे उमेदवार या टप्प्यात होते.

**<><><><><>**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या हाताळणीत निवडणूक आयोग पक्षपात करत असल्याचा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी आज पत्रकार परिषदेत केला. मतदार उत्साहाने मतदानासाठी येत आहेत, मात्र मतदान केंद्रातले अधिकारी दिरंगाई करत आहेत. मुंबईत अनेक ठिकाणी पिण्याचं पाणी, सावलीची सोय केलेली नाही. यामुळे ज्येष्ठ मतदार, महिलांची मोठी गैरसोय होत आहे, असा आरोप त्यांनी केला.

आमच्या पक्षाला मतं मिळण्याची शक्यता असलेल्या मतदारसंघांमध्ये मुद्दाम दिरंगाई होत आहे, मतदारांना पुनःपुन्हा ओळखपत्रं विचारली जात आहेत, असंही ठाकरे यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा प्रधानमंत्री बनवण्याचं, विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी अविश्रांत मेहनत घेणाऱ्या भाजपाच्या कार्यकर्त्यांसमोर आपण नतमस्तक असल्याचं भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटलं आहे. कार्यकर्त्यांना उद्देशून लिहिलेल्या पत्रात त्यांनी या भावना व्यक्त केल्या आहेत. निवडणुकीत मोठ्या यशाला गवसणी घालत ४ जूनला सर्वजण मिळून जल्लोष करू आणि महायुतीचा झेंडा अभिमानानं फडकवू असं बावनकुळे म्हणाले. घरदार विसरून, अथक परिश्रम करून कोट्यवधी मतदारांपर्यंत पोहोचणाऱ्या भाजपा कार्यकर्त्यांचा सार्थ अभिमान असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

राज्यात आज झालेल्या मतदानाचा आढावा घेणारा ‘मतदानाचा मागोवा’ हा चर्चात्मक कार्यक्रम अस्मिता वाहिनीवर सादर होणार आहे. हे बातमीपत्र संपल्यावर लगेचच म्हणजे रात्री सव्वा आठ ते पावणे नऊ या वेळेत हा कार्यक्रम सादर होईल.

**<><><><><>**

राज्य शिक्षण मंडळाने मार्च २०२४ मध्ये घेतलेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षांचे निकाल उद्या म्हणजे मंगळवार दिनांक २१ मे रोजी राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळाच्या संकेतस्थळावर दुपारी एक वाजता जाहीर

केले जाणार आहेत. मंडळाच्या https://mahahsscboard.in/ या संकेतस्थळावर हे निकाल विद्यार्थ्यांना पाहता येतील.

<><><><><>

छत्तीसगडमध्ये झालेल्या एका रस्ते अपघातात १९ जणांचा मृत्यू झाला. एका वाहनावरील ताबा सुटून ते वाहन खड्ड्यात पडल्याने हा अपघात झाला. कबीरधाम जिल्ह्यातील कुकडूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत बाहपनी गावाजवळ ही घटना घडली. या वाहनात २५ जण होते.

<><><><><>

अहमदाबादच्या सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळावर गुजरात दहशतवाद विरोधी पथकानं आज चार दहशतवाद्यांना अटक केली. हे चारही जण श्रीलंकेचे रहिवासी असून त्यांनी इस्लामिक स्टेट या संघटनेत सक्रिय असल्याची कबुली दिल्याची माहिती स्थानिक पोलिसांनी दिली आहे. श्रीलंकेहून चेन्नईमार्गे ते अहमदाबाद इथं आले असून पोलीस त्यांच्या प्रवासाबाबत अधिक तपास करत आहेत. प्राथमिक चौकशीत ते पाकिस्तानातल्या त्यांच्या नियंत्रकाकडून पुढील आदेशाची वाट बघत असल्याचं उघड झाल्याचं पोलिसांनी सांगितलं. गुजरात पोलिसांनी UAPA अर्थात बेकायदा कृत्ये प्रतिबंधक कायद्यान्वये त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

<><><><><>

भारताच्या बँकिंग क्षेत्रानं उल्लेखनीय झेप घेतल्याचे गौरवोद्गार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काढले आहेत. चालू आर्थिक वर्षात बँकिंग क्षेत्रानं प्रथमच ३ लाख कोटी रुपयांचा निव्वळ नफा नोंदवल्याच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्र्यांनी

समाजमाध्यमावर संदेश दिला आहे. सार्वजनिक आणि खासगी बँकांच्या निव्वळ नफ्यात ३९ टक्क्यांनी वाढ होऊन तो गेल्या वर्षीच्या २ लाख २० हजार कोटी रुपयांच्या तुलनेत ३ लाख १० हजार कोटींवर  पोहोचला आहे. यामुळे, शेतकरी, गरीब तसंच सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योजकांना पतपुरवठा करणं बँकांना अधिक सुलभ होईल असं मोदी यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

नुकत्याच मंजूर  झालेल्या भारतीय दंड संहिता, गुन्हेगारी दंड प्रक्रिया आणि भारतीय साक्षीपुरावा कायद्यांना आव्हान देणाऱ्या तीन जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयानं आज फेटाळल्या. यावर याचिकाकर्त्यानं आपण दाखल करत असलेली जनहित याचिका काढून घेण्याची परवानगी मिळावी अशी विनंती न्यायालयाकडे केली आहे.

**<><><><><>**

इराणचे अध्यक्ष इब्राहिम रईसी यांच्या अपघाती निधनानंतर इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्लाह अली खामेनेई यांनी उपराष्ट्राध्यक्ष मोहम्मद मोखबेर यांची काळजीवाहू अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. खामेनेई यांनी पाच दिवसांचा राष्ट्रीय दुखवटाही घोषित केला आहे. मोखबेर यांच्या नियुक्तीनंतर ५० दिवसांत नव्याने निवडणुका घेणं अनिवार्य आहे. इब्राहिम रईसी यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांना घेऊन जाणारं हेलिकॉप्टर काल दुपारी अपघातग्रस्त झालं होतं. अध्यक्ष रईसी आणि परराष्ट्र मंत्री होसैन अमीर-अब्दोल्लाहियान यांच्या अपघाती निधनामुळे उद्या एक दिवसाचा राष्ट्रीय दुखवटा भारतानं जाहीर केला आहे.

**//<><><><><>//**